३२२

## MAHARASHTRA ACT No. XLVII OF 1972

## THE MAHARASHTRA POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN UNIVERSITIES ACT, 1972

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १६ डिसेंबर १९७२ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLVII OF 1972

## AN ACT TO PROVIDE FOR THE POSTPONEMENT OF ELECTIONS TO THE AUTHORITIES OF CERTAIN UNIVERSITIES

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २१ डिसेंबर १९७२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७

**विवक्षित विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ शिवाजी विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ या विद्यापीठांच्या निरनिराळ्या प्राधिकरणांच्या निवडणुका पुढील काही महिन्यातच घेणे आवश्यक होते;

आणि ज्याअर्थी, अशा निवडणुकांचे प्रशासकीय काम आणि खर्च बराच आहे ;

आणि ज्याअर्थी, या विद्यापीठांनाही सध्या वित्तीय अडचणी आहेत आणि राज्यात सर्वत्र असलेल्या टंचाई निवारणार्थ खर्च करावयाचा असल्याकारणाने विद्यापीठांना सहाय्य देणे राज्य शासनाला शक्य होणार नाही ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील सर्व विद्यापीठांसाठी (कृषि विद्यापीठे वगळून) एका नवीन आणि एकरूप कायद्याची तरतूद करण्याचा प्रश्न राज्य शासनाच्या विचाराधीन आहे आणि अशा कायद्यामुळे, या विद्यापीठांच्या निरनिराळ्या प्राधिकरणांच्या रचनेत पुष्कळच बदल होतील ;

३२३

आणि ज्याअर्थी, उक्त विद्यापीठांच्या निरनिराळ्या प्राधिकरणांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याची आणि या प्राधिकरणांच्या विद्यमान सदस्यांचा पदावधी वाढविण्याची आणि उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित अशा इतर बाबींची तरतूद करणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती आणि त्यांनी दिनांक ४-नोव्हेंबर १९७२ रोजी महाराष्ट्र विवक्षित विद्यापीठांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अध्यादेश, १९७२ प्रख्यापित केला ;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेले विवक्षित फेरबदल करून, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ आणि कालावधी. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विवक्षित विद्यापीठांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक ४ नोव्हेंबर १९७२ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

(३) तो, २ मे १९७४ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत किंवा राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल अशा अगोदरच्या तारखेपर्यंत, अंमलात राहील, आणि त्यानंतर तो समाप्त होईल. या अधिनियमाच्या समाप्तीनंतर मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, जणू काही हा अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे, लागू होईल.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "विद्यापीठाची प्राधिकरणे" म्हणजे, अधिसभा किंवा विधिसभा, कार्यकारिणी किंवा कार्यकारी परिषद आणि संबद्ध अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये ज्या (संस्था) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणून जाहीर करण्यात आल्या असतील अशा कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असणाऱ्या इतर संस्था ;

(ब) "विद्यापीठ प्राधिकरणावरील निवडणूक" म्हणजे अशा प्राधिकरणाच्या सदस्याची निवडणूक ;

(क) "विद्यापीठाच्या प्राधिकरणाचा सदस्य" या शब्दप्रयोगात त्या प्राधिकरणाचा अध्यक्ष, अधिष्ठाता किंवा इतर कोणत्याही अधिकारी यांचा समावेश होईल ;

(ड) "संबद्ध अधिनियम" म्हणजे, त्या त्या विद्यापीठांच्या संबंधात, मुंबई विद्यापीठ अधिनियम, १९५३ किंवा श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ किंवा मराठवाडा विद्यापीठ अधिनियम, १९५८ किंवा शिवाजी विद्यापीठ अधिनियम, १९६२ किंवा नागपूर विद्यापीठ अधिनियम, १९६३ ;

(इ) "विद्यापीठे" म्हणजे मुंबई विद्यापीठ, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ.

विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या निवडणुका लांबणीवर टाकणे. ३. (१) संबद्ध अधिनियम व तदन्वये केलेले परिनियम, अध्यादेश, विनियम व नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) हा अधिनियम अंमलात असेल त्या कालावधीमध्ये, कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाची कोणतीही निवडणूक (आकस्मिक रीत्या रिकामी झालेली जागा भरण्यासंबंधीच्या निवडणुकीशिवाय) घेण्यात येणार नाही ; परंतु या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अशा कोणत्याही निवडणुकीस प्रारंभ झाला असेल व उमेदवारी मागे घेण्याची तारीख निघून गेली असेल त्या बाबतीत, अशी निवडणूक यथोचित रीत्या पार पाडण्यात येईल ;

(ब) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस जे पदावर असतील व हा अधिनियम अमलात असताना ज्यांच्या पदाची मुदत संपत असेल अशा विद्यापीठांच्या प्राधिकरणांवर निवडून आलेल्या सदस्यांचा (कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) [ज्यांची निवडणूक या पोट-कलमाच्या खंड (अ) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पार पाडण्यात यावयाची आहे असे सदस्य नसलेले] पदावधी वाढविण्यात आल्याचे मानण्यात येईल ; व त्यानुसार हा अधिनियम अमलात असेल त्या कालावधीत असे सदस्य पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

(२) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाच्या सदस्याची निवडणूक घेण्यासंबंधात निदेश देणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या किंवा संमत केलेल्या, न्याय-निर्णयास, हुकूमनाम्यास किंवा आदेशास पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे बाध येणार नाही ; आणि न्यायालयाच्या निदेशांनुसार अशी निवडणूक घेण्यात येऊन ती पार पाडण्यात येईल व प्राधिकरणाची रचना करण्यात येईल.

**विद्यमान प्राधिकरणांची वाढविलेली मुदत संपण्यापूर्वी, नवीन प्राधिकरणे प्रस्थापित करण्याची व्यवस्था करणे.**

४. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने शासकीय राजपत्रात अधिसूचित करावयाच्या तारखेनंतर (ही तारीख या अधिनियमाच्या समाप्तीपूर्वीची तारीख असेल), हा अधिनियम अमलात असताना विद्यमान प्राधिकरणांच्या सदस्यांचा वाढविण्यात आलेला पदावधी समाप्त होण्यापूर्वी, संबद्ध अधिनियम व तदन्वये केलेले उपविधी, अध्यादेश, विनियम आणि नियम यांच्या उपबंधांनुसार, नवीन प्राधिकरणे प्रस्थापित करण्याची व्यवस्था संबंधित विद्यापीठ प्राधिकरणाकडून करण्यात येईल.

**संबद्ध अधिनियम लागू करणे.**

५. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल त्याशिवाय, संबद्ध अधिनियम ज्या विद्यापीठाशी संबंधित असेल त्या विद्यापीठाला इतर तो सर्व बाबतीत लागू असेल.

**अडचणी दूर करणे.**

६. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उपस्थित झाल्यास, राज्य शासनास, अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक असल्याचे दिसून येईल असा, या अधिनियमाच्या उद्देशांशी व प्रयोजनांशी विसंगत नसणारा आदेश देता येईल.

**सन १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश तेरा रद्द करणे व व्यावृत्ती.**

७. (१) महाराष्ट्र विवक्षित विद्यापीठांच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याबाबत अध्यादेश, १९७२ हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.